परिपत्रक क्र. २० इ. ५ ते १० वी प्रश्नपत्रिका मागणीबाबत

**रयत शिक्षण संस्था,सातारा**

**माध्यमिक आस्थापना परीक्षा विभाग**

**परिपत्रक क्र. २० दिनांक. २३/०७/२०१९**

**महत्वाचे व तातडीचे**

सर्व शाखाप्रमुख,
माध्यमिक विद्यालये, रयत शिक्षण संस्था.
यांचेकडे ----

**विषय :- (१) इ. ५ वी ते १० वी पहिली सत्र परीक्षा, (सेमी इंग्रजी माध्यम वेगळी माहिती)**
**(२) इ. ५ वी ते ९ वी दुसरी सत्र परीक्षा, (सेमी इंग्रजी माध्यम वेगळी माहिती)**
**(३) इ. १० वी सराव परीक्षा-प्रश्नपत्रिकांबाबत, (सेमी इंग्रजी माध्यम वेगळी माहिती).**

वरील विषय संदर्भात आपणास कळविण्यात येते की, गतवर्षाप्रमाणे यावर्षीही इ. ५ वी ते १० वी अखेरच्या खाली नमूद केलेल्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका संस्थेच्या प्रेसमार्फत छापून घेऊन त्या सर्व शाखांना पोहोच केल्या जाणार आहेत. तसेच संस्था पातळीवर, संस्थेच्या सर्व माध्यमिक विद्यालयात सदरच्या परीक्षा एकाच तारखांना सुरु होऊन एकाच तारखेला समाप्त होतील अशा रितीने त्या त्या परीक्षेचे वेळापत्रक छापून घेऊन ते सर्व शाखांना पाठविले जाणार आहे.

**संस्था पातळीवर घेण्यात येणाऱ्या परीक्षा खालीलप्रमाणे.**

१. इ. ५ वी ते इ.१० वी पहिली सत्र परीक्षा आणि सेमी. इंग्रजी माध्यम परीक्षा.
२. इ. ५ वी ते इ.९ वी दुसरी सत्र परीक्षा आणि सेमी. इंग्रजी माध्यम परीक्षा.
३. इ. १० वी सराव परीक्षा आणि सेमी. इंग्रजी माध्यम परीक्षा.

वर नमूद केलेल्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका मागणी फॉर्मच्या प्रत्येकी दोन प्रती (सेमी.इंग्रजी माध्यमाच्या मागणीसाठी सदर फॉर्मच्या शेवटी स्वतंत्र नोंद करुन) आपण सदरचे दोनही फॉर्म्स काळजीपूर्वक भरावेत व **त्यातील नेहमीच्या मराठी माध्यमाचा फॉर्म भरल्यानंतर त्याच्या खाली ज्या शाखेत सेमी.इंग्रजी माध्यम सुरुअसेल त्या शाखांनी सेमी.इंग्रजी माध्यमाची माहिती भरुन, एक फॉर्म कोणत्याही परिस्थितीत ता. ०५/०८/२०१९ पूर्वी आपले विभागीय कार्यालयाकडे पोहोचेल अशा रितीने त्यांचेकडे पाठवावा.** दुसरा फॉर्म आपल्या शाखेच्या दप्तरी स्थळ प्रत म्हणून ठेवावा.

प्रश्नपत्रिका मागणी ही दहाच्या पटीतच बिनचूक करावी. सदरची माहिती वेळेत न आल्यास व त्यामुळे कांही अडचणी निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी.

**हे परिपत्रक http://www.rayatshikshan.edu या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

कळावे.

(श्री. विलास महाडीक)
सहसचिव (माध्य.),
रयत शिक्षण संस्था,सातारा.

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी -
१. सर्व इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था.
२. ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.

शाखेचे नाव :-

जा.नं.
दिनांक :-

## प्रश्नपत्रिका संख्यात्मक मागणी फॉर्म

| अ.नं. | विषयाचे नाव | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९ वी | १० वी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | मराठी | | | | | | |
| २) | हिंदी | | | | | | |
| ३) | इंग्रजी | | | | | | |
| ४) | इतिहास+राज्यशास्त्र/ना.शास्त्र | | | | | | |
| ५) | भूगोल | | | | | | |
| ६) | हिंदी + संस्कृत (संयुक्त) | | | | | | |
| ७) | संस्कृत संपूर्ण | | | | | | |
| ८) | भूगोल | | | | | | |
| ९) | गणित | | | | | | |
| १०) | (बीजगणित)गणित भाग-१ | | | | | | |
| ११) | (भूमिती) गणित भाग-२ | | | | | | |
| १२) | सामान्य विज्ञान | | | | | | |
| १३) | विज्ञान आणि तंत्रज्ञान | | | | | | |
| १४) | परिसर अभ्यास भाग १ व २ | | - | - | - | - | - |

## सेमी.इंग्रजी माध्यम प्रश्नपत्रिका संख्यात्मक मागणी फॉर्म

| अ.नं. | विषयाचे नाव | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९ वी | १० वी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | गणित | | | | | | |
| २) | बीजगणित | | | | | | |
| ३) | भूमिती | | | | | | |
| ४) | सामान्य विज्ञान | | | | | | |
| ५) | विज्ञान आणि तंत्रज्ञान | | | | | | |

शाखाप्रमुखाची सही व शिक्का